Karmaveer Pratishthan's Jalna

# Jalna College of Social Work, Ramnagar, Jalna

NAAC Accredited with ' B ' Grade

**One Day National Conference 16 January 2024**

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chattrapati Sambhajinagar

**" Social Problems in India "**

# Certificate

*This is to certify that Prof./~~Dr~~./~~Mr~~./~~Mrs~~.* Amol Nivrutti Kharat *of* Nutan Art's college, Rajapur, Tal - Sangamner *Has ~~attended~~/Participated of as a ~~Resource person~~ / ~~Chairperson~~ / ~~Delegate~~ / ~~Guest of Honour~~ / Presented a Paper entitled* Casteism is a social problem

*in one day National Conference on* **" Social Problems in India "** *held on 16th January 2024*

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Renuka D. Badvane (Bhavsar) | Dr. Narsing A. Pawar | Dr. Deepak M. Buktare | Dr. Rajkumar Mhaske |
| Convener | Convener | Convener | Principal |

Scanned by CamScanner

dr Amol Kharat

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**January- 2024**

ISSUE No - (CDLIII) 453-A

## Social Problems in India




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive-Editors**
Dr. Rajkumar H. Mhaske
Principal
Jalna College of social work , Jalna

**Editor**
Dr. Renuka D. Badwane-Bhavsar
Jalna College of social work , Jalna

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned by CamScanner

Impact Factor – 8.632, ISSN – 2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## January -2024

SSUE No - (CDLIII) 453-A

# Social Problems in India

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor**
**Director**
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Executive Editor**
**Dr. Rajkumar H. Mhaske**
**Principal**
Jalna College of Social Work , Jalna

**Editor**
**Dr. Renuka D. Badwane-Bhavsar**
Jalna College of social work , Jalna

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher



Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
January 2024


| | | |
|---|---|---|
| 18 | बाल विवाह थांबवा — गोविंद लक्ष्मण तांगडे , प्रा. डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे | 82 |
| 19 | स्त्रीभ्रूणहत्या : एक समस्या — डॉ.कातळे संगिता गुलाबराव | 85 |
| 20 | कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारा लैगिंग छळ — प्रा. डॉ. मिना भगवान बोर्डे, वैशाली एकनाथ थोरात | 89 |
| 21 | अनुकंपा धर्तीवर काम करणाऱ्या महिलांवर होणारा कौटूंबिक अत्याचार आणि कायदा — कांबळे रावसाहेब हरिबा, डॉ. जितेंद्र पुंडलिकराव कोकणे | 92 |
| 22 | कृषी प्रधान भारतात शेतकरी आत्महत्या — डॉ.दीपक भुसारे | 97 |
| 23 | कौटुंबिक हिंसाचार आणि महिला — प्रा. रमेश नानजी गावित | 101 |
| 24 | जल प्रदूषण आणि पर्यावरण — प्रा.डॉ.संजय पांडुरंग पाटील | 107 |
| 25 | जातीयवाद एक सामाजिक समस्या — प्रा. अमोल निवृत्ती खरात | 113 |
| 26 | जातीयवाद एक सामाजिक समस्या — प्रा. डॉ. रमेश शेवाळे | 116 |
| 27 | भूमण्डलीकरण के दौर में हिंदी कविता में चित्रित किसान विमर्श — पवार प्रियंका विलास | 120 |
| 28 | अलका सरावगी के साहित्य में महिलाओंपर होने वाले अन्याय — प्रा. खुडे शुभांगी मनोहर | 123 |
| 29 | आदिवासी काव्य में अभिव्यक्त आदिवासियोंकी समस्याएँ — डॉ.दिलीप गिऱ्हे | 127 |
| 30 | बेरोजगार स्त्रियांच्या समस्या आणि उपाय — डॉ .रामेश्वरी नरेशराव कमठम | 130 |
| 31 | कामाच्या ठिकाणी महिलांचा होणार लैंगिक छळ — प्रा. डॉ. पहारे एस आर , सुवर्णा डी बुऱ्हाण | 135 |
| 32 | Depiction Of Domestic Violence And Immorality In Vijay Tendulkar's *Sakharam Binder* — **Dr. Kushaba A. Salunke** | 139 |
| 33 | Theme Of Violence Against Women In Toni Morrison's Novel Jazz — **Dr. Prashant Udhavrao Gambhire** | 143 |
| 34 | Casteism and Communalism in Indian Society — **Dr. Mohammed Mudassir Ahmed** | 145 |
| 35 | To Study of Agrarian Crisis and Suicide by Farmers in India — **Dr. Renuka D. Badvane( Bhavsar)** | 148 |
| 36 | A study of Mental Health and Emotional Maturity among Child Labor students and other adolescence — **Dr. Pravin Kadam , Dr. Ravindra K. Jadhav** | 152 |




Scanned by CamScanner

# जातीयवाद एक सामाजिक समस्या

प्रा. अमोल निवृत्ती खरात
नूतन कला महाविद्यालय, राजापूर

**प्रस्तावना-**

बिन-चेहऱ्याचा एक फार मोठा मानवी समुह हजारो वर्षे गावकुसाबाहेरच्या अघोषित आणि बहिष्कृत डी-टेन्शन कॅम्पसमध्ये राहतं आलाय. या समुहाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार जन्मजातच नाकरला गेला आणि आजही नाकारला जातोय. म्हणूनच ही शोकांतिका आहे की आज देखिल आपल्याला जातीयवादावर स्फुटनिक युगातही चर्चा करावी लागते. जातीयवादाविरुद्धची लढाई ही फक्त दर्जाच्या आणि संधीच्या समानतेसाठीची लढाई नाही तर प्रस्तापितांच्या श्रेष्ठात्वा विरुद्धची लढाई आहे. ब्राम्हणवादी मानसिकतेतून आलेल्या या श्रेष्ठत्वाने अंत्यज्यांचा ज्ञानाचा, नामसंकिर्तनाचा, उत्पादन देणाऱ्या भौतिक साधनांच्या मालकीचा हक्क-अधिकार नाकारला. त्यामुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमतेची दरी ही अधिकच रुंदवत गेली. या विषमतेचे मुळ हे येथील ब्राम्हणवादी व्यवस्थेतच आहे. म्हणून परकीय शत्रू इतकाच देशा अंतर्गत असणारा ब्राम्हणवाद हा देशासाठी विघातक आणि देशद्रोही असा आहे.

**उद्दिष्ट्ये-**

१) जातीय व्यवस्थेचा अभ्यास करणे.
२) ब्राम्हणवादी वर्चस्वाचा अभ्यास करणे.
३) जातीयवादावर उपाय सुचवणे.

**१) ब्राम्हणवादाचा अर्थ -**

आपल्या जाती-धर्माचा दुराभिमान बाळगत दुसऱ्या जातींचा-धर्मांचा उग्र व्देष करणे म्हणजे जातीयवाद होय. ही साधी सोपी जातीयवादाची कार्यात्मक व्याख्या आहे. या व्याख्येच्या विश्लेषणातच ब्राम्हणवादाचे खरे गुपित रहस्य दडलेले आहे. ते असे की आपली जात किंवा धर्म कोणताही असो, परंतू इतर जातीं-धर्मांच्या तुलनेत जातींच्या-धर्मांच्या वेगळयापणांपेक्षा, आपलीच जात, आपलाच धर्म इतर जातीं-धर्मांपेक्षा श्रेष्ठ ही मनामध्ये असलेली श्रेष्ठत्वाची भावना इतर जातीं-धर्मांच्या उग्र व्देषाचे कारण ठरते. त्यामुळेच ब्राम्हणवाद हा श्रेष्ठत्वाचे व्देतक आणि जातीयवादाचे मुळ आहे. आणि म्हणूनच जातीयवादाच्या या विषवृक्षाला तोडायचे असेल तर त्याच्या ब्राम्हणवादी मुळावरच घाव घालावा लागेल.

**२) जातीचे तथाकथित स्वरूप -**

समान सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठेची व्यवस्था असणाऱ्या लोकांच्या समुहाला जात असे म्हणतात. म्हणून ज्या जातीची प्रतिष्ठा जन्मताच आपल्याला लाभलेली आहे, ती जात जन्मासाठी आपण निवडलेली आहे का? की त्या जातीत आपण संयोगाने जन्माला आलो? याची प्रत्येकाने चिकीत्सा करून स्वतःला एक प्रश्न विचारावा, ज्या जात-धर्माचा आपण दुराभिमान बाळगतो, महापुरुषांच्या जातीत आपली जात शोधून त्यांच्या महानपणात आपल्या जातीचे आणि आपले स्वतःचे खोटे मोठेपण मिरवतो त्यात काय तथ्य आहे? मुळातच जगातल्या कोणत्याही महापुरुषांना जात जन्मला घालत नाही तर त्याच्या काळातील परिस्थितीची गरजच त्यांना त्यांच्या महान कर्तुत्वाने महापुरुष बनवते. म्हणूनच कोणताही महापुरुष कोणत्याही एका तथाकथित जातीचा कधीच नसतो तो एकाच वेळी संपुर्ण मानव जातीचा असतो.

जातीची फक्त समाजशास्त्रीय चिकीत्सा केल्यानेच ती तथाकथित ठरतं नाही तर जीवशास्त्र असे म्हणते की जगातल्या सर्व मानवांचा (होमो सेपियन्स्) जीनोम हा ९९.९८% सारखा असल्याने मानव हा सारखाच आहे. जात नैसर्गिक नसून कृत्रिम आहे हे सिद्ध करण्यासाठी अनेक शास्त्रांचे अनेक दाखले येथे देता येतील की जे जातीला छद्म ठरवतात.

**३) जातीयवादावरील उपाय**

**अ) सामाजिक न्यायाच्या तत्वाचा अवलंब -**

जात कृत्रिम असली तरी तीला एक सामाजिक वास्तव आहे. जातीला एका प्रकारची उतरंड असल्याने उतरंडीत खालच्या किंवा वरच्या स्तरातील असणाऱ्या कोणा एकाला जात नाकारता येत नाही आणि जरी त्याने ती नाकारली तरी उतरंडीतील व्यवस्था त्याला फक्त माणूस म्हणून जगू देतं नाही. ही व्यवस्था आपल्या सोईने माणसात जात शोधतेच.

माणसां-माणसांत ही वर्णाश्रमाची चार्तुवर्ण व्यवस्था ज्या ब्राम्हणी व्यवस्थेने कायमस्वरूपाच्या सर्व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्वार्थासाठी निर्माण केली. ती व्यवस्था आजही तांत्रिक स्वरूपात यंत्रवत काम करते. उदाहरणार्थ



Scanned by CamScanner

आजही दर्जाच्या आणि संधीच्या समानतेचा विचार न करता धार्मिक स्थळामध्ये एका उच्चभ्रू जातीचा पुरोहीत वर्ग दिसतो (हे एका प्रकारचे हजारोंवर्षांपासूनचे अघोषित आरक्षणच आहे) आणि दुसरीकडे गटार वाहून नेणाऱ्या नाल्याची सफाई करणारा कामगारही हा दुसऱ्या शुद्र जातीचा दिसतो. या साध्या उदाहरणावरूनही आजच्या जातीयवादाची दाहकता किती भयानक आहे हे दिसून येते.

आजही जात गृहीत धरून हिंसा, अन्याय व अत्याचार आणि जात पाहूनच हिंसेचा निषेध केला जातो. (उदा. खैरलांजी हत्याकांड) काही वर्षांपूर्वी खर्डा येथे आंतरजातीय प्रेम प्रकारणातून सतरा-आठरा वर्षांच्या निरागस नितीन आगेचा जातीयवादाने बळी (ऑनर किलिंग) घेतला. तर गावकुसाबाहेर पालावरच्या एका मुलीने भाजीसाठी शेतातून चार-पाच वांगे तोडले म्हणून गावातील प्रस्तापितांनी भाजीच्या चार वांग्यात चोरी शोधून, चोरीचा आळ घालून सर्व पालवं पेटून दिले. असे एक ना अनेक जातीय हिंसाचाराचे उदाहरणं पोलिस दप्तरी आहेत तर कैक भितीच्या अंधारात लुप्त झाले आहेत.

म्हणूनच सामाजिक दृष्ट्या वंचित, उपेक्षित, असक्षम व असंघटित असणाऱ्या वर्गाला कायद्याचे संरक्षण आणि सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय दिला पाहिजे.

**ब) दर्जाची आणि संधीची समानता -**

व्यास लिखीत महाभारत काव्यानुसार जातीने भिल्ल म्हणजेच शुद्र (समकालीन व्यवस्थेनुसार) असणाऱ्या एकलव्याकडे धर्नुविद्याचा दर्जा हा द्रोणाचार्याकडे धर्नुविद्येचे ज्ञान घेणाऱ्या शिष्यां इतकाच उत्कृष्ट होता किंबहुना त्याहुनही अधिक चांगला. परंतू शुद्र असल्या कारणाने दर्जा असूनही ज्ञानार्जनाची संधी त्याच्याकडे नव्हती. भलेही एकलव्याने स्वयंप्रेरणेने ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न त्याने केला तरी देखिल द्रोणाचार्यांनी कपटाने त्याचा आंगठाच कापून घेत त्याच्याकडे असलेला त्याचा दर्जा नाकारला.

भारतात हजारोंवर्षांपासून स्त्री आणि शुद्रांना शिक्षण, सामाजिक व राजकीय क्षेत्रात दर्जाची आणि संधी समानता नव्हती ती कायद्याने दिली. दर्जा सिद्ध करण्याची संधी असली तरी धावण्याच्या स्पर्धेत उपाशी पोटी असणारा स्पर्धक सगळ्या सुख-सुविधा लाभलेल्या आणि पोट भरलेल्या स्पर्धका बरोबर बरोबरी करु शकतं नाही. म्हणून "पिढ्यान-पिढ्या ज्यांचे जगण्याचे अधिकार प्रस्थापित व्यवस्थेने नाकारलेले आहेत, ते अधिकार त्यांना परत देवून जगण्याच्या स्पर्धेत निर्धोकपणे उतरण्याचे सामर्थ प्राप्त करून दिले पाहिजे. म्हणजे प्रतिनीधीत्व दिले पाहिजे, ज्याला सोप्या शब्दात आरक्षण असे म्हणतात. आरक्षणाने कोणताही समाज आर्थिकदृष्ट्या श्रीमंत होत नाही कारण आरक्षण हे प्रतिनिधीत्व आहे ना की गरीबी हटाव योजना. प्रतिनिधित्व आदर्श निर्माण करते आणि त्यामुळे इतर समाजाला पुढे जाण्याची प्रेरणा भेटते.

**क) जाती अंताचा मार्ग -**

उच्च शिक्षणाने, एकत्र भोजनावळया घातल्याने, आंतरजातीय विवाहने व आर्थिक संपन्नता आल्याने माणसातून "जात" जात नाही. ती मनुस्मृती सारख्या ब्राम्हणी ग्रंथांमध्ये आहे आणि त्या ग्रंथांची राख केल्याशिवाय जात जाणार नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. एका महान माणसाचं फार समकालिन आणि दुरदृष्टकोनी वक्तव्य आहे हे. कारण मागास असणाऱ्या वर्गा बाबतीत वरील सर्व गोष्टी घडल्या आहेत. तरी जात मात्र अजून तशीच आहे. म्हणून सर्वांनी मिळून ब्राम्हणवादाचा पाया असणाऱ्या ब्राम्हणी ग्रंथांना तिलांजली दिलीच पाहिजे.

तो पर्यंत जात समजण्याकरिता मुक्त विचार करायला लावणारं शिक्षण आणि ते शिक्षण घ्याता यावं म्हणून मोफत दर्जेदार शिक्षणाची सोय तसेच हा समाज नैसर्गिक व्हावा यासाठी अनुकुल आणि प्रतिकुल आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जानवं तोडा जात जोडा सारखे समाज उपयोगी उपक्रम समाजात व्हावे. आणि जाती अंतासाठी सर्वात महत्वाची बाब म्हणजे समाजात बहुजनवाद रुजायला हवा.

**समारोप -**

जातीचा खोटा अभिमान भाकरी देऊ शकत नाही. म्हणून माणसाने जातीची मनुवादी मानसिक गुलामी सोडून फक्त माणूस म्हणून समृद्ध व्हावे. भारत माझा देश आहे आणि सर्व भारतीय माझे बांधव आहेत हा बंधुभाव प्रत्येकाने अंगिकारला पाहिजे.

सर्व जातीं-धर्मांकडे पाहण्याची नजर ही निरोगी आणि डोळस हवी. तसेच युटोपियन समरसतेपेक्षा प्रमुख्याने तरुणांमध्ये बहुजानवाद रुजायला हवा.

असे घडले तर एक दिवस जातीयवाद आणि जातीयवादाचा पाया असणारा ब्राम्हणवाद यांना तिलांजली भेटेल.



Scanned by CamScanner

संदर्भ-
१) भारतीय समाज और जातीयवाद - इंजीनियर डी.के. प्रभाकर
२) संस्थाने आणि अल्पसंख्याक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
३) जातियव्यवस्थेचे उच्चाटन - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
४) धर्माचा वैदिक वाङ्मयातील उदय आणि विकास, मूळ इंग्रजी प्रबंध - डॉ. पंजाबराव शामराव देशमुख, अनुवाद आणि संपादन प्रा. डॉ. आनंद पाटील
५) इंटरनेट, दैनिक व मासिके



Scanned by CamScanner